**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** भाग्य नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/02/2026 21:25

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 03/02/2026
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/02/2026
**Time From (वेळेपासून):** 12:07 वजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:20 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/02/2026 **Time (वेळ):** 21:04 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 049
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/02/2026 21:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महात्मा कबीर माध्यमिक शाळा,सहयोग नगर नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती अर्चना वैजनाथ करपुडे

(b) **Guardian's Name** (पालक चे नाव) : वैजनाथ करपुडे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8087343862

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनोहर अर्जुनराव शिंदे | | पालक का नाम : अर्जुनराव शिंदे | 1. घर नंबर 221 सयोग नगर नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | सचिन सतिश शिवरामवार | | पालक का नाम : सतिश शिवरामवार | 1. सशोधरा नगर जय हिंद पार्क, सिडको नांदेड,भाग्य नगर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

पो.स्टे. भाग्यनगर गुरनं. 65/2026 कलम 7, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे.
1) फिर्यादी - श्रीमती अर्चना वैजनाथ करपुडे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8087343862
2) आरोपी -1) मनोहर अर्जुनराव शिंदे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद सहायक शिक्षक, नेमणुक महात्मा कबीर प्राथमिक व माध्यमिक शाळा, संयोगनगर नांदेड रा. घर नंबर 221 सयोग नगर नांदेड 2) सचिन सतिश शिवरामवार, वय 39 वर्ष, व्यवसाय नोकरी पद सेवक, नेमुणक महात्मा कबीर प्राथमिक व माध्यमिक शाळा, सयोगनगर नांदेड रा. सशोधरा नगर जय हिंद पार्क सिडको नांदेड
3) गुन्हा.घ.ता. वेळ.व ठीकाण – दि. 03/02/2026 रोजी वेळ 12.07 ते 12.20 वाजताचे दरम्यान महात्मा कबीर माध्यमिक शाळा सहयोग नगर नांदेड पुर्वेस 01 किमी
4) दाखल करणार - पोउपनि हनमंत शिंदे, मो.नं. 9309970858 पो. स्टे. भाग्यनगर नांदेड.
5) खुलासा -
सादर विनंती की, वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र. 01 याने तक्रारदार राणी साहेबराव भिसे यांची 10 वी पासची सनदवर जन्म दिनांक दुरूस्त करून आनली व केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन 400/- रूपयाची मागणी करून स्वत: साठी व आरोपी क्र. 02 याचेसाठी स्विकारली म्हणुन म्हणुन आरोपी क्र. 01 व 02 यांचेविरूध्द कलम 7, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे मा. पो.नि. सा. यांच्या आदेशाने गुन्हा नोंद करून पुढील तपास श्री राहूल तरकसे पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांच्या कडे देण्यात आला आहे.
दाखल करणार – पोउपनि हनमंत शिंदे, मो.नं. 9309970858 पो. स्टे. भाग्यनगर
तपास अधिकारी - श्री राहूल तरकसे पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड मो.नं. 8411808328

फिर्याद दिनांक:-03/02/2026

मी श्रीमती अर्चना वैजनाथ करपुडे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8087343862
सरकार तर्फे फिर्यादी होवुन लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील सहा महीन्यापासुन पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

आम्ही दिनांक 02/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री राहूल तरकसे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावुन तक्रारदार कुमारी राणी साहेबराव भिसे वय 24, व्यवसाय शिक्षण रा. पिरबुन्हानगर नांदेड जि.नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.
त्यावरून आम्ही तक्रारदार कुमारी राणी साहेबराव भिसे हिला विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार हिने कळविले की, ती सद्या संभाजीनगर येथे स्पर्धा परिक्षाची तयारी करते. सन 2016 मध्ये महात्मा कबीर प्राथमिक व माध्यमिक शाळा सहयोगनगर नांदेड येथे दहावीचे शिक्षण पुर्ण झाले आहे. तिच्या दहावी पासच्या सनदवर जन्म दिनांक हा चुकीचा पडल्याने तो दुरूस्त करण्यासाठी दिनांक 23/09/2025 रोजी महात्मा कबीर माध्यमिक शाळा सहयोग

नगर नांदेड येथे गेली. त्यावेळी त्याठिकाणी मनोहर शिंदे सर यांना भेटून तिच्या दहावी पासच्या सनदवर चुकीचा जन्म दिनांक पडला आहे असे तक्रारदार भिसे यांनी शिंदे सर यांना सांगीतले तेव्हा शिक्षक शिंदे तक्रारदार हिला म्हणाले की, मी लातुर बोर्ड येथे जावुन सनद वरील जन्म दिनांक दुरूस्त करून घेतो. त्यासाठी मला एक हजार रूपये दया असे शिंदे सरांनी म्हणाल्याने तक्रारदार हिने तिचे मोबाईल नंबर 7887763512 वरून मनोहर शिंदे सर यांचा मोबाईल नंबर 9881156696 वर दिनांक 23/09/2025 रोजी फोन पे वर 1000/-रूपये पाठविले आहे. तक्रारदार हिला स्पर्धा परिक्षाचा फॉर्म भरण्यासाठी सनद आवश्यक असल्याने तिने वेळोवेळी मनोहर शिंदे सर यांना कॉल करून विचारणा केली. त्यांनी हो मी काम करून देतो, त्यासाठी अजुन 2200/- रू लागतील असे म्हणुन तक्रारदार हिचेकडून दिनांक 15/12/2025 रोजी फोन पे द्वारे 2200/- रू घेतले.
त्यानंतर दिनांक 27/01/2026 रोजी तक्रारदार हिचे व्हॉटसॲप नंबर 7887763512 मनोहर शिंदे सर यांनी मेसेज करून सनद दुरूस्त करण्याकरीता परत 400/- रू ची मागणी करीत आहेत. याबाबत तक्रारदार भिसे हिने तिचे वडीलांना सांगितले. त्यावरून तिचे वडील हे दिनांक 30/01/2026 रोजी शाळेत जावुन मनोहर शिंदे सर यांना भेटले. मनोहर शिंदे यांनी सांगीतले की, तुमचे मुलीचे काम झाले आहे. त्यासाठी मला 400/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी करीत आहे.
तक्रारदार राणी भिसे हिचे केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन मनोहर शिंदे हे मागत असलेले पैसे ही लाच असल्याची खात्री झाली आहे. परंतु तक्रारदार हिला लाच देण्याची इच्छा नाही. तक्रारदार व शिक्षक शिंदे यांचेमध्ये पैसे देण्याघेण्याचा आर्थिक व्यवहार नाही व शिक्षक शिंदे सोबत तक्रारदार यांचे वैर नाही. लोकसेवक मनोहर शिंदे यांनी स्वतः किंवा इतरामार्फत लाच स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी वगैरे मजकुराचा तक्रारी अर्ज दिला. त्याअनुशंगाने पुढील गोपनिय कामाकरीता आमच्याकडे पुर्वीच उपलब्ध असलेले पंचायत समिती कार्यालय, नांदेड येथील दोन शासकीय पंच यांना बोलावुन घेतले. त्यानंतर महिला तक्रारदार भिसे यांनी त्यांची लोकसेवक यांच्या विरूध्दची तक्रार दोन्ही पंचास तोंडी सांगीतली त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार भिसे यांनी दिनांक 02/02/2026 रोजी दिलेली तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री करून त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापुर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर दोन्ही पंच यांना सापळा कार्यवाहीत अंमलदार पोहेकॉ/114 राजेश राठोड, पोकॉ/1487 ईश्वर जाधव, पोकॉ/श्याम गोरपडे असे सापळा पथक यांची ओळख करून दिली. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व आमचे वक्तव्य घेतले. त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी तक्रारदार भिसे व पंच क्रमाक 1 महेश्वर जाधव यांना लोकसेवक मनोहर शिंदे शिक्षक यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून ला.प्र.वि कार्यालय येथुन 15:00 वाजता महात्मा कबीर माध्यमिक शाळा सहयोग नगर नांदेड येथे रवाना केले. त्यानंतर 15:21 वाजताचे सुमारास तक्रारदार भिसे व पंच क्र. 1 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार भिसे व पंच क्र. 1 श्री महेश्वर जाधव यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, आम्ही दोघे महात्मा कबीर माध्यमिक शाळा सहयोग नगर नांदेड येथे गेलो. तेव्हा महिला तक्रारदार भिसे हया मनोहर शिंदे सर यांना भेटले तेव्हा त्यांनी सांगितले की, तुमचे काम करून ठेवले आहे. सनद ही झगडे सर यांच्याकडे आहे, तुम्ही 5 वाजता या असे सांगितले. त्यामुळे आम्ही दोघे परत आलोत असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार भिसे व पंच क्रं. 1 यांना 16.05 वाजता व्हाईस रेकॉर्डर चालु करून महात्मा कबीर माध्यमिक शाळा सहयोग नगर नांदेड येथे शिक्षक शिंदे यांच्याकडे पडताळणी करीता पाठविण्यात आले. त्यानंतर 16:23 वाजता तक्रारदार भिसे व पंच क्रं. 1 जाधव हे ला.प्र.वि कार्यालय येथे परत आले. तेव्हा तक्रारदार यांच्या गळ्यातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार भिसे व पंच क्र. 1 श्री महेश्वर जाधव यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, आम्ही दोघे महात्मा कबीर माध्यमिक शाळा, सहयोग नगर नांदेड येथे गेलो त्या ठिकाणी मनोहर शिंदे सर होते तेव्हा महिला तक्रारदार भिसे यांनी शिंदे सर यांना म्हणाले की "सर माझी सनद", तेव्हा शिंदे सर म्हणाले की, "चारशे रूपये देवून टाक ते मामा कडे", तेव्हा तक्रारदार म्हणाले कोणाकडे तेव्हा शिंदे सर म्हणाले सचिन मामाकडे, तेव्हा तक्रारदार म्हणाले "सर पैसे तर सद्या नाहीत ना सर" तेव्हा शिंदे सर म्हणाले "सचिन मामा त्यांनीच गेले होते आनायला, त्यांनी त्यांचे स्वतः टाकुन आनलेत अणि माझे दोन चार चकरा झाल्या माहिती आहे का, माझं काहीच म्हणना गेलो तुला", तेव्हा तक्रारदार म्हणाली सर.. "पण आता नाहीत ना सर", तेव्हा शिंदे म्हणाले, "मग आता घेवुन जा नंतर पाठव" बर सर ऑनलाईन करते नबंर, त्यावर शिंदे म्हणाले टाकून दे ना माझ्या मोबाईल वर तेव्हा तक्रारदार म्हणाले फोन पे वर होत नाही घरून घेवून येते सर पैसे तेव्हा शिंदे सर म्हणाले "साहीन कर आगोदर घे तुझा ताब्यात", त्यानंतर तक्रारदार भिसे हे शाळेतील ऑफीस मध्ये जावून घाडगे सर यांच्या कडून सनद घेवून सही दिली. सनद घेवुन ऑफीस च्या बाहेर आले तेव्हा शाळेतील सेवक सचिन मामा हे भेटले व तक्रारदार हिला म्हणाले की, "पैसे टाकले का चारशे रू "? तेव्हा तक्रारदार भिसे म्हणाली की, "अता कशाचे पैसे",

तेव्हा सेवक सचिन मामा म्हणाले, ते काही माहित नाही, सरानी सांगितले. तेव्हा तक्रारदार म्हणाले विचाराना सराना, तेव्हा सचिन मामा म्हणाले की, तुम्हीच विचारा सराना असे बोलले. त्यांनतर तक्रारदार भिसे हे शिंदे सर यांच्या जवळ गेली तेव्हा त्यांना सांगितले की, सर घेतली सनद तेव्हा शिंदे सर म्हणाले बरोबर ओके आहे ना, तेव्हा तक्रारदार म्हणाली सर ते काहीतरी म्हणत होते, तेव्हा शिंदे सर म्हणाले "टाका त्यांच्याच अकाउंट वर, टाका नंबर बंद आहे, ह्या नंबर 9921234245" तेव्हा तक्रारदार म्हणाली सर "300/- रू दिले तर चालेल का"? तेव्हा शिंदे सर म्हणाले "नाही मी जाने येण्याला दिलो होते त्यांला", तेव्हा तक्रारदार म्हणाले "सर मी तुम्हाला मनल तेव्हा दिले ना, पहिले 1000/- रूपये, नंतर 2200/- रू दिले". तेव्हा शिंदे सर म्हणाले "हो ना बाबा... मी किती चकरा मारले तुझ्यासाठी मी तर माझे म्हणनाच गेलो, तुला 2200 ते 2300 झाले, एका पोरीने साध्या याला 3000/- रू दिलेत", त्यानंतर तक्रारदार म्हणाली ट्रान्झेक्षन होत नाहीत सर, तेव्हा शिंदे म्हणाले जा नंतर टाकून दे, तेव्हा तक्रारदार म्हणाली "मी उदया आणुन देते, कॅश आनुन देते" तेव्हा शिंदे सर म्हणाले, "हो"असे म्हणाले तेव्हा आम्ही व तक्रारदार असे दोघे मिळून ला.प्र.वि कार्यालयात परत आलोत. त्यांनतर महिला तक्रारदार भिसे यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी पंच क्रं. 1 यांनी सांगितल्या प्रमाणे हकीकत सांगितली. त्यांनतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक शिंदे यांच्या भेटी दरम्यान डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. लाचमागणी पडताळणीत लोकसेवक शिक्षक मनोहर शिंदे व सेवक सचिन यांनी तक्रारदार भिसे यांना त्यांचे इयत्ता दहावी पास च्या सनद वरील जन्म दिनांक लातुर बोर्ड येथून दुरूस्त करून आनल्याबदल 400/- रू लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले. त्यामुळे सर्वानुमते पुढील सापळा कार्यवाही उदईक दिनांक 03/02/2026 रोजी करण्याचा निर्णय घेतला. दिनांक 03/02/2026 रोजी महिला तक्रारदार भिसे यांनी त्यांचे जवळील 400/- रुपये रक्कम ज्यात 100/- रुपये दराच्या चार नोटा पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने पोकाँ/जाधव यांना दिलेल्या सुचना प्रमाणे त्यांनी तक्रारदार व दोन्ही पंचास अँन्थ्रासिन पावडरचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. व लाच रक्कम 400/- रुपये रक्कम ज्यात 100/- रुपये दराच्या चार नोटा यास अँथ्रासिन पावडर लावुन महिला तक्रारदार भिसे यांचे पर्स मध्ये ठेवले त्यानंतर पोकाँ/गोरपल्ले यांना डिजीटल व्हाईस रेकाँर्डर चालु करुन देण्याची सुचना दिली. त्यानंतर सर्व सापळा पथक यांना सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सविस्तर सुचना दिल्या. पोकाँ/गोरपल्ले यांनी त्यांचे जवळील डिजीटल व्हाईस रेकाँर्डर 12:07 वाजता चालु करुन तक्रारदार व पंच क्रं. 1 यांना महात्मा कबीर विद्यालय सहयोग नगर नांदेड येथे शिक्षक शिंदे यांची भेट घेण्यासाठी त्यांच्याकडे रवाना केले. व सर्व सापळा पथक शासकीय वाहनाने तक्रारदार यांचे पाठोपाठ महात्मा कबीर माध्यमिक शाळा नांदेड येथे पोहचलो. तेव्हा तक्रारदार यांनी आमचे सुचने प्रमाणे सर्व सापळा पथक आजुबाजुला आल्याची खात्री करुन लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी महात्मा कबीर माध्यमिक शाळेतील लोकसेवक शिक्षक मनोहर शिंदे यांचेकडे गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी शाळेच्या बाहेर येवून 12:20 वाजता लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यांवेळी तक्रारदार यांचे गळ्यातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर आम्ही व सापळा पथक तात्काळ महात्मा कबीर माध्यमिक शाळेमध्ये पोहचलो. त्यानंतर तिथे असलेले पंच क्र. 1 यांना आम्ही विचारले की, तक्रारदार यांचेकडे कोणी लाचेची मागणी केली व लाचेची रक्कम कोणी स्विकारली तेव्हा पंच क्र.1 यांनी सांगीतले की, हे शिक्षक मनोहर शिंदे यांनी तक्रारदार यांना त्यांचे दहावी पास सनद वरील जन्म दिनांक दुरुस्त करून दिल्या बद्दल तक्रारदार यांचेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम 400/- रुपये स्वतः स्विकारुन त्यांनी त्यांचे शर्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही पंच क्र. 2 यांचेकरवी लोकसेवक शिंदे यांच्या खिष्यातून अँन्थ्रॉसिन पावडरयुक्त 400/-रुपये रक्कम ज्यात 100/- रुपये दराच्या चार नोटा लाचेची रक्कम काढून लोकसेवक यांचे ताब्यातून हस्तगत करण्यात आली. त्यानंतर शाळेमधील सेवक सचिन शिवरामवार यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही सापळा कार्यवाही दरम्याण घडलेली हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी सांगितले की, शाळेमध्ये शिंदे सर यांच्याकडे गेली असता त्यांना मी म्हणले की, सर हे तुम्ही म्हणल्या होत्या पैसे त्यावर शिक्षक शिंदे म्हणाले कि, काय गरबड होती,ऑनलाईन कराव की, त्यावर तक्रारदार हि म्हणाली कि, ऑनलाईन नव्हते त्यामुळे आणले आहे असे तक्रारदार म्हणली असता शिंदे यांनी बर, बर म्हणुन लाचेची रक्कम स्विकारून त्यांनी त्यांचे शर्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी शाळेच्या बाहेर येवून लाच स्विकारती बाबत पुर्वनियोजीत इशारा केला.

त्यानन्तर लोकसेवक क्र. 1 श्री मनोहर अर्जुनराव शिंदे लोकसेवक क्र. 2. सचिन सतीश शिवरामवार यांना 12:50 वाजता ताब्यात घेवुन सापळा पथकासह ला.प्र.वि कार्यालय नांदेड येथे हजर आलो.

सरी तक्रारदार कुमारी राणी साहेबराव भिसे, वय 24 वर्ष, व्यवसाय शिक्षक, रा. पिरबुहानगर नांदेड जि. नांदेड यांनी दिनांक 02/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 02/02/2026 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व दिनांक 03/02/2026 रोजी सापळा पुर्व व

सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक मनोहर अर्जुनराव शिंदे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद सहायक शिक्षक, नेमणुक महात्मा कबीर प्राथमिक व माध्यमिक शाळा, सयोगनगर नांदेड रा. घर नंबर 221 सयोग नगर नांदेड यांनी तक्रारदार यांचे दहावी पास सनद वरील जन्म दिनांक लातुर येथून दुरूस्त करून आनली व केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन 400/- रुपयांची मागणी करून स्वतःसाठी व सेवक सचिन सतिश शिवरामवार, वय 39 वर्ष, व्यवसाय नोकरी पद सेवक, नेमुणक महात्मा कबीर प्राथमिक व माध्यमिक शाळा, संयोगनगर नांदेड रा. सशोधरा नगर जय हिंद पार्क सिडको नांदेड यांच्यासाठी स्विकारल्या नंतर लाचेच्या रक्कमेसह मिळुन आले आहे. त्यामुळे लोकसेवक क्र. 1 श्री मनोहर अर्जुनराव शिंदे व आरोपी क्र. 2 सचिन सतीश शिवरामवार यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः वाव क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANTOSH BAPURAO TAMBE(I (Inspector)) / 15101000402SBTM8201Q **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANTOSH BAPURAO

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 15101000402SBTM820